# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मातृभाषेचे स्थान

**प्राचार्य डॉ. चंद्रकांत एम. बोरसे**
*म.वि.प्र.स. चे शिक्षणशास्त्र*
*महाविद्यालय नाशिक.*

**प्रा. सुनीता लक्ष्मण आवंडकर**
*मोतीवाला कॉलेज ऑफ*
*एज्युकेशनल सायन्सेस नाशिक.*

भाषा हे संवाद साधण्यासाठीचे प्रभावी माध्यम आहे. आपले विचार, भावना, कल्पना नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व आवश्यक असते. मात्र भाषेवर प्रभुत्व मिळविण्यापर्यंतचा प्रवास हा सहज सोपा आणि आनंददायी असायला हवा. मातृभाषा ही अनुकरणातून शिकल्या जाते. लहान मूल आपल्या आई वडिलांच्या, आजीआजोबांच्या तसेच घरातील इतर व्यक्तींच्या भाषेच्या, त्यातील शब्दांच्या अनुकरणाने एक एक शब्द नंतर संपूर्ण वाक्य बोलायला शिकतं. ही एक नैसर्गिक आणि सहज घडणारी प्रक्रिया असते. प्राण्यांच्या, पक्षांच्या, वस्तुंच्या आवाजामध्ये आणि ध्वनी मधून लहान मूल स्वतःच्या भाषेत त्या विशिष्ट प्राणी, पक्षी, वस्तू ला नाव देऊन आपल्या मेंदूत साठवतं. भाषा निर्माण होण्यासाठी कारण कुठलं का असेना, भाषेमुळे मेंदूची वाढ झाली आणि मेंदूच्या वाढीमुळे पुन्हा भाषेची वाढ झाली हे मात्र निश्चित. व्यक्तीमध्ये त्याच्या वाढ व विकासातील पहिली दोन वर्ष भाषेच्या वाढीसाठी महत्वाची असतात. या काळात पालक मुलांशी किती वेळा बोलतात. यावर त्याच्या संपूर्ण आयुष्यातील भाषा अवलंबून असते. असं शिकागो विद्यापीठामधला जॅनेलन हटनलॉकर म्हणतो. या काळात लहान मूल जितके जास्त नवीन शब्द, भाषा, त्यातील वाक्य ऐकतील तितका त्यांचा शब्द संचय वाढत जातो.

## <u>मेंदू आणि भाषाज्ञान</u>


मेंदूमध्ये भाषा निर्माण होण्यासाठी 'ब्रोकाज एरीया ' हा भाग महत्वाची भूमिका पार पडतो. आणि भाषा कळण्यासाठी मेंदूमध्ये ' व्हर्निकेज एरीया ' हा भाग महत्वाचा असतो. शब्द तयार होणं, बोलणं, वाचणं आणि लिहिणं अशा आपल्या वेगवेगळ्या क्षमतांसाठी आपल्या मेंदूमध्ये वेगवेगळी केंद्रे व जागा असतात. भाषा आणि तिची रचना किंबहुना आपण मातृभाषेमध्ये जी वाक्यांची रचना करतो, शब्द संचय करतो, त्यामुळे आपले विचार

आकाराला येत असतात आणि त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पडत असतात. लिहिणे आणि वाचणे या दोन्ही क्षमतेसाठी मेंदूमध्ये वेगवेगळी केंद्र असतात. आपण जर मुलाला भाषेचा उपयोग आणि अनुकरण करायला शिकवलं नाही किंवा त्याच्याशी संवाद साधला नाही तर भाषेच्या केंद्रांमधील न्यूरॉन्स इतर कारणांसाठी किंवा इतर क्षमतेसाठी वापरले जातात. आणि मग भाषेची वाढ खुंटते. याच कारणामुळे ज्या व्यक्ती बोलण्यास किंवा श्रवणास अक्षम आहेत त्या व्यक्तींच्या इतर क्षमता ह्या वाढलेल्या दिसून येतात. आजपर्यंत मेंदू वर अनेक संशोधनं झालेली आहेत. त्यामधून भाषेच्या शिक्षणाशी संबंधित बऱ्याच बाबी समोर आलेल्या आहेत. उदाहरणार्थ बालकांचा दहा वर्षे वयापर्यंतचा कालावधी हा भाषेच्या सहज शिक्षणाचा कालावधी असतो. मज्जामानसशास्त्रज्ञ असे सांगतात की, जगामधील शेकडो भाषांमध्ये एकत्रितरित्या पाहिले असता, सुमारे शंभर स्वर असतात आणि बालकांची याच वयात, मेंदूमध्ये पेशींची जी जुळणी चाललेली असते. तिच्यात हे सर्वच्या सर्व स्वर आत्मसात करण्याची मेंदू मध्ये उपजतच क्षमता असते. ही वैश्विक व्याकरण क्षमता जेवढी वापरात येते तेवढीच टिकून राहते. या वयात वापर होत नाही त्या क्षमता असणाऱ्या मेंदूमधील पेशी मृत पावतात, नष्ट होतात. मुलांना नवीन भाषा शिकविणे आणि मुलांच्या कानावर सतत नवीन भाषेतील शब्द कानावर पडून मुलांनी नैसर्गिकरीत्या भाषा शिकणे यामध्ये फरक आहे. दोन्ही बाबी भिन्न आहेत. सहजपणे, संवादांतून, गोष्टीमधून आणि सतत शब्द कानावर पडून शिकलेली कोणतीही नवीन भाषा मुलांसाठी सहज प्रक्रिया असते. कारण तशा प्रकारची व्यवस्था त्याच्या मेंदूमध्ये निसर्गतःच आहे.

या उलट ज्या मुलांना इंग्रजी शब्द वाक्य, संवाद ऐकण्यासाठीची जर कौटुंबिक पार्श्वभूमी नसेल त्या मुलांना इंग्रजी भाषा ही जाणीवपूर्वक शिकावी लागते. ती सहज प्रक्रिया होत नाही त्यासाठी त्यांना एका भाषेतून म्हणजेच आपल्या मातृभाषेच्या आधारे ती नवीन असणारी इंग्रजी भाषा शिकावी लागते. एक भाषा जर उत्तम येत असेल म्हणजेच आपल्या मातृभाषेवर जर प्रभुत्व असेल तर इंग्रजी किंवा कोणतीही नवीन भाषण गरजेपुरती केव्हाही शिकता येते .

**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**

विद्यार्थ्यांचा समतोल आणि सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. म्हणजेच शिक्षणाच्या माध्यमातून विकासाचे सर्व घटक लक्षात घेऊन विकास साधणे अपेक्षित आहे. सर्वांगीण विकासात शारीरिक विकास, मानसिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास इत्यादी सर्व प्रकारचे घटक लक्षात घेणे गरजेचे आहे. जेव्हा भाषिक विकासाचा विचार होतो तेव्हा मातृभाषेचा समावेश होणे आवश्यक आहे. शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी विविध अध्ययन अनुभव देण्यात येतात. विविध कृतींच्या माध्यमातून श्रवण, भाषण लेखण आणि वाचन इत्यादी कौशल्यांच्या विकासावर भर देण्यात येतो. यामधूनच विद्यार्थ्यांची मातृभाषा सुद्धा विकसित होत असते. विद्यार्थी मातृभाषेचे उपयोजन विविध माध्यमाद्वारे करीत असतात. उदा. भाषण देणे, वादविवाद स्पर्धेत भाग घेणे, वकृत्व स्पर्धेमध्ये भाग घेणे, शब्दकोडे भरणे इत्यादी. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता विद्यार्थी व पालकवर्ग हा इंग्रजी माध्यमांतून शिक्षण घेण्याकडे आकर्षित झालेला आहे. इंग्रजीचा आदर असावा कारण ती ज्ञानभाषा आहे. जागतिकीकरणाच्या काळात बहुभाषिक असणे आवश्यकच आहेत. परंतु आपले आपल्या मातृभाषेकडे दुर्लक्ष होता कामा नये. कारण मातृभाषा आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासामधील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ज्या भाषेतील शब्द आपल्या कानावर पडून आपण लहानाचे मोठे झालोत त्याच भाषेमध्ये आपण आपल्या भावना, विचार अगदी सहजपणे व्यक्त करू शकतो. म्हणून मातृभाषा अधिक प्रभावशाली बनवण्यासाठी आज गरज आहे, ती शुद्ध बोलणे, शुद्ध आणि निर्दोष लिहिणे मातृभाषेतून व्यक्त होणे .




आकृतीमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व बाबींच्या वृद्धीमुळे तसेच तिच्या प्रभावशाली उपयोजनाने व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जातो.

**<u>व्यक्तिमत्व विकासात भाषेचे स्थान</u>**

व्यक्तीमत्वाला पैलू पाडण्यासाठी भाषा किंबहुना मातृभाषा अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. मातृभाषा उत्तम असेल, तिचा प्रभावी उपयोग करता येत असेल आणि मातृभाषेतून व्यक्त होता येत असेल तर. सामाजिक शैक्षणिक प्रश्न हाताळल्या जाऊ शकतात. इतरांच्या हृद्या पर्यंत पोहचता येतं.

'या हृदयीचे त्या हृदयी घातले

हृदयी हृदय एक झाले '

अर्थात स्वभावना दुसऱ्या पर्यंत पोहचविणे, ज्ञानाचा प्रसार व संक्रमण भाषेमुळेच शक्य होते. त्याचप्रमाणे स्वआरोग्य उत्तम राखण्यासाठी सुद्धा भाषा मदत करीत असते. उत्तम वाचन, उत्तम लेखन यातून विचार प्रगल्भ होत जातात, व्यक्तिमत्वाला पैलू पडतात आणि कधीही निराशा, दुःख, एकटेपणा वाटत नाही. संभाषण कौशल्य हे सुद्धा भाषेवरील प्रभुत्वामुळेच प्राप्त होते. त्यातूनच कोणत्याही परिस्थितीचा आणि वातावरणाचा स्वीकार करून समायोजन कौशल्य निर्माण होते. उत्तम संभाषणामुळेच व्यक्ती इतर व्यक्तींशी,

समाजाशी जोडली जाते, त्यातूनच नेतृत्वगुण विकसित होतात. कोणत्याही प्रसंगी नेतृत्व करण्याचे धाडस अंगी बाणल्या जाते. हे सर्व शक्य होते ते मातृभाषेवरील प्रभुत्वामुळे.

**मातृभाषेचा विकास व शिक्षकाची भूमिका**

१. शिक्षकांनी मेंदूधिष्ठित अध्ययनाला महत्त्व द्यावे आणि त्यानुसार विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव द्यावे. उदा. मातृभाषेतून स्वतःचे विचार व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध विषय द्यावेत व संधी उपलब्ध करून द्याव्यात. शब्दकोडे भरणे, म्हणी पूर्ण करणे इत्यादी कृती कार्यक्रमांचे उपयोजन करावे.

२. विद्यार्थ्यांच्या स्पष्ट उच्चार, निर्दोष लेखन यासाठी 'लेखक तुमच्या भेटीला' 'पुस्तकाच्या गावाला भेटी' इत्यादी क्षेत्रभेटीचे आयोजन करून निर्दोष संभाषण, वाचण, लेखन यासाठी प्रेरित करावे .

३. बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा, सामाजिक समूह संपर्क साधनांचाही योग्य उपयोग करता येईल उदा. सूविचार स्वतः तयार करणे, कथा लिहिणे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवीन कृती करण्यासाठी प्रेरित करावे व भाषेचे अध्ययन अधिक रंजक करावे . Audio, Videos, मोबाईल फोन यांचा शैक्षणिक साधन म्हणून उपयोग करावा.

४. पत्र लेखन केवळ अभ्यास म्हणून न शिकविता प्रसंगाला अनुसरून प्रत्यक्ष लिहायला सांगून आई, वडील भाऊ, बहीण यांच्यासाठी लिहायला सांगून प्रत्यक्ष त्या व्यक्तीपर्यंत पोहोचवावे. यातूनच लेखन कौशल्या बरोबरच मानसिक व भावनिक विकास साधता येईल.

५. बहुभाषिक असणे ही काळाची गरज आहे. म्हणून शिक्षकांनी जाणीवपूर्वक विविध भाषा त्यांचे विविध अर्थ समजावून सांगितले तर अध्यापन रंजक करता येईल. तसेच विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेलाही अध्ययनात स्थान देता येईल. बोलीभाषा, प्रदेशानुसार बदलणारी भाषा, प्रमाणभाषा, परकीय भाषा अशा सर्व भाषांचे ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थी सक्षम असतात. गरज आहे ती डोळसपणे बघण्याची आणि विद्यार्थ्यांसोबत स्वतः अध्ययनार्थी बनून शोध घेण्याची यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल व शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

**नवे शैक्षणिक धोरण २०१९ आणि भाषाविषय**

१. पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकविली जाईल. उर्वरित विषय (इंग्रजीसह) विषय म्हणून शिकवला जाईल.

२. बहुभाषिक शिक्षण - मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.

येत्या काळात मातृभाषा, स्थानिक भाषा यांना शिक्षणामध्ये महत्वाचे स्थान मिळणार हा बदल स्वागतार्ह आहे. कारण यातूनच मराठी हा केवळ विषय म्हणून शिकविला जाणार नाही तर भाषा म्हणून शिकविली जाणार.

बहुभाषिक शिक्षणाची सद्यस्थिती असे दर्शविते की आंध्रप्रदेश व ओडिशा या राज्यांमध्ये ८ - १० आदिवासी भाषांचा समावेश करून पद्धतशीर, नियोजनबद्ध कार्यक्रम राबविले जात आहेत. आसाम छत्तीसगड, बिहार आणि झारखंड या राज्यांमध्ये मुलांच्या घरी बोलली जाणारी भाषा आणि अनुदेशनाचे माध्यम यांच्यातील दरी सांधण्यासाठी शब्दकोष, वाचन कार्डे इत्यादी प्रकारचे साहित्य विकसित केले आहे. अशा प्रकारच्या परिवर्तनाची आज शिक्षणातील सर्वच स्तरावर गरज आहे. विद्यार्थ्यांना केवळ माहिती व सूचना देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणार नाही तर नवीन शैक्षणिक धोरणाने स्वीकारलेला आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन अवलंबून भाषेचा विकास करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**

१. गोडबोले अच्युत, 'मनात' (२०१३) अठरावी आवृत्ती, मनोविकास प्रकाशन पुणे

२. पानसे रमेश, 'भाषाग्रहण व भाषाशिक्षण,' (२०१५), पहिली आवृत्ती, ग्रंथाली प्रकाशन पुणे

३. www.maharashtra.gov.in